# साथरोग नियंत्रण व पाणी शुध्दीकरण कृती योजना सन २०११- २०१२

## अ साथरोग नियंत्रण

| अ. न. | कृती | कृतीस जबाबदार | कृती पूर्ण करणेची तारीख | कृतीची खातरजमा |
|---|---|---|---|---|
| १ | जोखीमग्रस्त गावांची यादी अद्ययावत करणे (गेल्या तीन वर्षातील साथउद्रेक झालेली गावे, पाणी टंचाईची गावे, मोठया यात्रा भरणारी गावे इ. चा समावेश करुन) | वैद्यकिय अधिकारी / जिल्हा आरोग्य अधिकारी | ३० एप्रिल | यादी उपसंचालक मंडळे व सहसंचालक आरोग्य सेवा (आरोग्य) पुणे यांना पाठविणे |
| २ | वैद्यकिय पथकाची स्थापना करणे (प्रत्येक जिल्हयात जिल्हास्तरावर १ व तालुकास्तरावर १ या प्रमाणे पथके स्थापन करण्यात यावीत या पथकात वैद्यकिय अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक, प्रत्येकी १ वाहन व १ वाहन चालक याप्रमाणे) | जिल्हा आरोग्य अधिकारी | १० मे | यादी उपसंचालक मंडळे व सहसंचालक आरोग्य सेवा (आरोग्य) पुणे यांना पाठविणे |
| ३ | औषधसाठा निकषाप्रमाणे प्रा. आ. केंद्रास उपलब्ध करुन देणे. (ओआरएस पॉकिटे, आर.एल., ॲन्टी बायोटिक्स, सी.बी.मिडीया इत्यादी) | जिल्हा आरोग्य अधिकारी / जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा | ३१ मे | औषध साठा उपलब्ध केल्याचे प्रमाणपत्र उपसंचालक, आरोग्य सेवा, सहसंचालक, आरोग्य सेवा ( आरोग्य ) पुणे यांना पाठवावे. |
| ४ | प्र.आ.केंद्रास साथ नियत्रण साधन सामुग्री किट तयार ठेवणे(औषध साठा, ओ. टी. टेस्ट साहित्य, सी.बी.मिडीया इत्यादी) | वैद्यकिय अधिकारी / जिल्हा आरोग्य अधिकारी | ३१ मे व सतत | जिल्हा स्तरीय, राज्य स्तरीय अधिका-यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र भेटीत याबाबत खात्री करावी. |
| ५ | २४ तास कार्यरत असणा-या साथ नियंत्रण कक्षाची स्थापना | जिल्हा आरोग्य अधिकारी | १ जून ते ३१ ऑक्टोबर | नियंत्रण कक्षाचे दुरध्वनी क्रमांक सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य) पुणे यांना १ जून पर्यंत व वेळोवेळी कळवावे. |

| अ. न. | कृती | कृतीस जबाबदार | कृती पूर्ण करणेची तारीख | कृतीची खातरजमा |
|---|---|---|---|---|
| ६ | प्रत्येक प्राथमिक केंद्रामध्ये किमान १ वैद्यकिय अधिकारी (शक्यतो एम.बी.बी.एस) कार्यरत असणेबाबत दक्षता घेणे | जिल्हा आरोग्य अधिकारी | ३१ मे पूर्वी | कृती पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य) पुणे यांना पाठविणे |
| ७ | साथीचे प्राथमिक व अंतिम अहवाल मुदतीत मा. सह संचालक, आरोग्य सेवा (आरोग्य) पुणे व मा. उपसंचालकांना सादर करणे | जिल्हा आरोग्य अधिकारी | नियमित | जिल्हा आरोग्य अधिका-यांच्या मासिक सभेत आढावा घेवून |
| ८ | शौच नमुने गॅस्टो, अतिसार, हगवण इत्यादी एकुण रुग्णांच्या किमान १० टक्के शौच नमुने घेणे त्यासाठी सी.बी.मिडिया बॉटलचा पुरेसा साठा प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करणे | जिल्हा आरोग्य अधिकारी | सतत | वैद्यकिय अधिकारी यांच्या मासिक सभेत |
| ९ | आरोग्य शिक्षण साहित्य वाटप व वापराबद्दल खात्री करणे (१५ मे ते जून अखेर पर्यंत जलजन्य आजाराची जनजागरण मोहिम राबविणे) | जिल्हा आरोग्य अधिकारी | नियमित | जिल्हा स्तरावरील अधिका-यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र भेटीच्या वेळी |
| १० | अप्रशिक्षित वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी अतिसार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण आयोजित करणे. | प्राचार्य, आरोग्य व कू.क प्रशिक्षण केंद्र | मे व डिसेंबर | प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र यांनी वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण पथके यांचे सभेद्वारे |
| ११ | प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यकक्षेतील खाजगी वैद्यकिय व्यावसायिकांना रिंगर लॅक्टेट व ओ.आर.एस. या अतिसार जलशुष्कतेवरील उपचाराबाबत माहिती दयावी. | वैद्यकिय अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी | ३१ मे पूर्वी वेळोवेळी | वैद्यकिय अधिका-यांच्या जिल्हास्तरीय मासिक बैठकीत आढावा घ्यावा. |
| १२ | क्षारसंजीवनीचा साठा ग्रामस्तरावर उपलब्ध करावा अंगणवाडी सेविका / डेपो होल्डर यांना वापराबाबत प्रशिक्षण देऊन त्यांची नावे गावातील सर्वांना कळवावी | वैद्यकिय अधिकरी व जिल्हा आरोग्य अधिकारी | ३१ मे पूर्वी व वेळोवेळी | वैद्यकिय अधिका-यांच्या जिल्हास्तरीय मासिक बैठकीत आढावा घ्यावा. |
| १३ | जिल्हयातील मोठया यात्रेसंबंधीच्या उपाय योजनांचा कृती आराखडा | जिल्हा आरोग्य अधिकारी / जिल्हा शल्य चिकित्सक | ३१ मे पूर्वी व वेळोवेळी | वैद्यकिय अधिकारी / वैद्यकिय अधिक्षक यांच्या जिल्हास्तरीय मासिक बैठकीत आढावा घ्यावा. |
| १४ | आपतकालीन व्यवस्थापनाचा कृती आराखडा | जिल्हा आरोग्य अधिकारी / जिल्हा शल्य चिकित्सक | ३१ मे पूर्वी | वैद्यकिय अधिकारी / वैद्यकिय अधिक्षक यांच्या जिल्हास्तरीय मासिक बैठकीत आढावा घ्यावा. |

## ब. शुध्द व सुरक्षित पाणी करण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही

| अ. न. | कृती | कृतीस जबाबदार | कृती पूर्ण करणेची तारीख | कृतीची खातरजमा |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतीने नेमून दिलेल्या व्यक्तीस पाणी शुध्दीकरणाचे प्रशिक्षण देणे | वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र | ३१ मे | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे स्तरावरील अधिका-यांचे समन्वय सभेद्वारे |
| २ | पाणी नमूने तपासणीसाठी घेणे, (प्रत्येक प्राथमिक आरोग्य क्रेंदाच्या कार्यक्षेत्रातून कमीत कमी दरमहा १० पाणी नमुने आरोग्य सेवकामार्फत गोळा करणे, जोखीमग्रस्त गावातील पाणी नमुने प्राध्यान्याने घेणे) | वैद्यकिय अधिकारी / जिल्हा आरोग्य अधिकारी | दरमहा | वैद्यकिय अधिकारी यांचे मासिक सभेत आढावा, उपसंचालक आरोग्य स्तरावर जिल्हयातील अधिका-यांच्या मासिक सभेत आढावा. |
| ३ | दुषित पाणी नमुन्याबद्दल संबंधितांना कळविणे | वैद्यकिय अधिकारी | नियमित | ग्रामसेवकांच्या मासिक सभेत गट विकास अधिकारी यांनी आढावा घेणे |
| ४ | ग्रामीण भगातील पाणी साठा (सार्वजनिक) साधनांची पहाणीनुसार लाल व हिरव्या रंगाचे कार्ड ग्रामपंचायतींना देणे (ग्रामविकास विभाग जलसंधारण विभागाच्या १४ जून ९४ व २८ नोव्हेंबर ९६ च्या परिपत्रकानवये | वैद्यकिय अधिकारी | ऑक्टोबर ते जानेवारी | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समन्वय सभेद्वारे |
| ५ | ब्लिचींग पावडर, क्लोरीन गोळया, द्रवक्लोरीन खरेदी अर्थिक तरतूदीसाठी प्रस्ताव | डपमुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हा आरोग्य अधिकारी | फेब्रुवारी | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी समन्वय सभेद्वारे |
| ६ | ब्लिचींग पावडरचा ग्रामपंचायतींना पुरवठा करणे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | ३१ मे | गट विकास अधिका-यांकडून प्रमाणपत्र प्राप्तीचा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समन्वय सभेत आढावा. |
| ७ | ब्लिचींग पावडर खरेदी करतांना दर्जाबाबत गुणवत्तेबाबत प्रयोगशाळा अहवालाबाबत खात्री करुन घेणे | गटविकास अधिकारी | नियमित | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी समन्वय सभेत आढावा |
| ८ | प्रत्येक ग्रामपंचायतीमधून ब्लिचींग पावडर नमुना किमान तीन वेळा दर्जा तपासणीसाठी घेवून प्रयोगशाळेत पाठविणे | वैद्यकिय अधिकारी | नियमित | वैद्यकिय अधिका-यांचे मासिक सभेत आढावा |

**पाणी टंचाईग्रस्त भागात साथरोग नियंत्रण व पाणी शुध्दीकरण कृती योजना सन २०११- २०१२**
**पाणी टंचाईग्रस्त गावांत - साथरोग नियंत्रण, शुध्द पाणी पुरवठा**

| अ.क्र. | कृती | कृतीस जबाबदार व्यक्ती |
|---|---|---|
| १. | पाणी टंचाई ग्रस्त गावांची अद्ययावत यादी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध असणे | वैद्यकिय अधिकारी / गटविकास अधिकारी |
| २. | दुष्काळग्रस्त भागात प्राधान्याने, नियमित सर्वेक्षण करणे व आरोग्य सुविधा पुरविणे | आरोग्य सेवक / आरोग्य पर्यवेक्षक / वैद्यकिय अधिकारी |
| ३. | टंचाईग्रस्त भागातील पाणी पुरवठा सोई, साधनांची गाववार नोंद करणे | पाणी पुरवठा कर्मचारी / आरोग्य सेवक |
| ४. | पाण्याचे दैनंदिन शुध्दीकरण बाबत ग्रामपंचायतींना सूचना | वैद्यकिय अधिकारी / गटविकास अधिकारी |
| ५. | पाणी टंचाई असणा-या गावातून पाणी साठयाचे पाणी नमूने तपासणी | पाणी पुरवठा कर्मचारी / आरोग्य सेवक |
| ६. | टॅंकर चालकांना पाणी शुध्दीकरणाचे प्रशिक्षण | आरोग्य पर्यवेक्षक / वैद्यकिय अधिकारी |
| ७. | वैयक्तीक स्वच्छता, परिसर स्वच्छता व साथरोगाविषयी आरोग्य शिक्षण देणे | आरोग्य सेवक /आरोग्य पर्यवेक्षक / वैद्यकिय अधिकारी |
| ८. | साथरोग संबंधित औषधांचा अतिरिक्त साठा उपकेंद्र व प्रा.आ.केंद्रात उपलब्ध असणे | आरोग्य सेवक / वैद्यकिय अधिकारी / जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ९. | पाणी स्त्रोत निवडताना स्वच्छ, शुध्द, पाण्याचा स्त्रोत्र निवडण्यात यावा | पाणी पुरवठा कर्मचारी / अधिकारी |
| १०. | पाणी पुरवठयासाठी वापरण्यात येणारा टॅंकर, आतून बाहेर स्वच्छ ठेवण्यासाठी दक्षता घ्यावी (कमीत कमी आठवडयातून एकदा स्वच्छ करण्यात यावा.) | टॅंकर चालक- मालक / पाणी पुरवठा अधिकारी |
| ११. | प्रत्येक टॅंकरसोबत योग्य प्रतिची व पुरेशी ब्लिचिंग पावडर सतत उपलब्ध असणे व पाणी शुध्दीकरण नोंदवही ठेवणे | टॅंकर चालक- मालक / पाणी पुरवठा अधिकारी / गटविकास अधिकारी |
| १२. | नियमित फिरतीच्या वेळी वाटेत पाण्याचे टॅंकर भेटल्यास टॅंकर सोबतचे रजिस्टर व त्यातील नोंदी यांची पडताळणी करावी, ओ.टी.टेस्ट घ्यावी व आवश्यक त्या सूचना द्याव्यात. | आरोग्य सेवक, वैद्यकिय अधिकारी, गटविकास अधिकारी, जिल्हास्तरीय अधिकारी |
| १३. | दुष्काळी कामावर पुरवविण्यात येणा-या पाण्याची ओ.टी.टेस्ट घेवून शुध्दीकरण झाल्याची खात्री करणे व नोंद ठेवणे व आरोग्य सुविधा पुरविणे. | पाणी पुरवठा कर्मचारी / ग्रामसेवक / आरोग्य सेवक |
| १४ | ब्लिचिंग पावडरचा अतिरिक्त साठा ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध असणे | ग्रामसेवक / गटविकास अधिकारी |
| १५. | पाणी टंचाई भागात टॅंकरने शुध्द पाणी पुरवठा केला जाईल याची खबरदारी घेणे | ग्रामसेवक / गटविकास अधिकारी |